# शेतमजूर व रोजगार हमी
# कामगार समन्वय समिती (महाराष्ट्र)

## मजूरमंत्र्यांना सादर केलेले निवेदन

मूल्य : रू. ३/-

# प्रस्तावना

देशाच्या एकूण श्रमिकांपैकी शेतमजूर हा सर्वात मोठा विभाग आहे आणि तो सर्वात जास्त शोषित आणि पिडित आहे. अत्यंत कमी पगार, महागाई भत्त्याच्या अभावी एकसारखे खालावते जीवन, काम मिळण्याच्या अनिश्चिततेमुळे मिळकतीत पडणारा खड्डा, दुष्काळ व पूर इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे परागंदा होण्याची पाळी, कायमचा कर्जबाजारीपणा, भरमसाठ व्याज, उन्हातान्हात व थंडीवाऱ्यात आणि पावसापाण्यात काम करावे लागणे, औषधपाण्याच्या व्यवस्थेचा अभाव, म्हातारपणात आधाराचा अभाव अशाप्रकारे सर्व बाजूंनी प्रतिकूल परिस्थितीत जगणारा हा कामगार वर्गाचा विभाग असंघटित क्षेत्रात आहे आणि बहुतांशी असंघटित आहे. त्यामुळे त्यांच्या दैन्याला पारावार नाही. अशाप्रकारचे जीवन जगणाऱ्या कोट्यवधी जनतेमध्ये अर्ध्याहून अधिक स्त्रिया आहेत. दलित व आदिवासी धरून राष्ट्राच्या या दुर्बल गणल्या गेलेल्या घटकांची शेतमजुरांमध्ये प्रचंड बहुसंख्या आहे. भारतीय शासन दुर्बल घटकांना संरक्षण देण्याची सतत बडबड करत आले आहे. भारतीय शासनाने चालविलेली ही सर्वात घोर प्रतारणा होय. शेती क्षेत्रात वाढत असलेल्या भांडवली सधन शेतकरी थराच्या पूर्णपणे वर्चस्वाखाली असलेल्या भारतीय शासनाकडून निराळी अपेक्षा करता येणार नाही. शेतमजुरांना व निम शेतमजूर असलेल्या गरीब शेतकऱ्यांना जात, धर्म, लिंग, पक्ष इत्यादी भेदांच्यावर व धनदांडग्यांच्या धाक दपटशावर मात करून अशक्य ते शक्य केले पाहिजे आणि माणुसकीचे जीवन मिळविण्यासाठी संघटित राहिले पाहिजे.

जगात आणि भारतातही स्त्री-मुक्तीचे, स्त्री-संघटनेचे युग सुरु होत आहे. शेतमजुरांची चळवळ संघटित होण्यास खेड्यापाड्यातील स्त्रियांमधील जागृती निश्चित मदतकारक ठरू शकेल. शेतमजुरांना संघटित करू पाहणाऱ्यांनी त्यांच्या जीवनाच्या सर्वांगावर प्रयत्न करणे आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे खुद्द शेतमजूर गरीब शेतकरी स्त्री-पुरुषांमधून व दलित व आदिवासीमधून चळवळीचा पुढाकार घेणारे कार्यकर्ते तयार झाले पाहिजेत. पुढे आणले गेले पाहिजेत. त्यांच्या शिक्षणासाठी शेतमजूर, गरीब शेतकऱ्यांच्या प्रश्नाबद्दल त्यांच्या मातृभाषेतून पुस्तिका प्रसिद्ध होणे जरुरीचे आहे. प्रस्तुत पुस्तिका त्या दिशेने सुरुवात ठरेल अशी आशा आहे.

**संतराम पाटील, निमंत्रक**
शेतमजूर व रोजगार हमी कामगार
समन्वय समिती (महाराष्ट्र)

# शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समिती (महाराष्ट्र)

१. २४ एप्रिल, १९९५ रोजी मुंबईत शेतमजूर व रोजगार हमी योजना कामगार समन्वय समितीच्या नेतृत्वाखालील विविध शेतमजूर संघटनांमार्फत शेतमजुरांच्या मागण्यांसाठी शेतमजुरांचा मोर्चा मंत्रालयावर काढण्यात आला होता. या मोर्चास आपण स्वतः सामोरे आलात. शेतमजुरांच्या मागण्यांचे निवेदन स्वीकारलेत, सहानुभूती दाखविलीत आणि त्यावेळी शेतमजुरांना खालील आश्वासन दिले होते.

''वाढती महागाई लक्षात घेता, शेतमजुरांच्या किमान वेतनाची शास्त्रीय पायांवर फेररचना करण्यासाठी तात्काळ किमान वेतन समितीची स्थापना करून त्या समितीस तीन महिन्यांचे आत आपला अहवाल सरकारला द्यायला सांगू.''

शेतमजूर आणि रोजगार हमी योजना कामगार समन्वय समितीच्या विविध संघटनांचा असाच एक प्रचंड मोर्चा किमान वेतनाच्या प्रश्नावर २० एप्रिल, ९३ रोजी विधानभवनावर आला होता. त्यावेळच्या सत्ताधारी काँग्रेसचे मजूरमंत्री त्या मोर्चाला सामोरे तर आले नाहीतच पण मोर्चाच्या प्रतिनिधींची भेट घेण्यासही त्यांनी नकार दिला होता. त्याचा निषेध करण्यासाठी तेव्हा लाक्षणिक सत्याग्रहही केला होता. त्या प्रसंगाची तीव्रतेने आठवण मोर्चेकऱ्यांना साहजिकच झाली. या पार्श्वभूमीवर शेतमजुरांच्या मोर्चाला सामोरे येऊन आपण त्यांच्या मागण्यांचे निवेदन स्वीकारून जे जाहीर आश्वासन दिलेत, यातून शेतमजुरांबद्दल, त्यांच्या प्रश्नांबद्दल आपली आणि आपल्या सरकारची आस्था आणि संवेदनशीलता दिसून आली. याबद्दल समन्वय समिती आपले प्रथम आभार मानत आहे.

महाराष्ट्रातील शेतमजूर आणि रोजगार हमी योजना कामगारांच्या विविध मागण्यांबाबत विशेषतः किमान वेतनाबाबत आपण जे आश्वासन २४ एप्रिल ९५ रोजी दिले होते, त्या संदर्भात शेतमजूर व रोजगार हमी समन्वय समिती (महाराष्ट्र)चे आम्ही प्रतिनिधी आज ता. १३ जून १९९५ रोजी चर्चेसाठी आलो आहोत. आपण आम्हाला चर्चेसाठी पाचारण केलेत; याचे आम्ही स्वागत करतो.

दिनांक २४ एप्रिल १९९५ रोजी शेतमजुरांच्या प्रश्नांबाबत जे निवेदन देण्यात आले, त्यामध्ये शेतमजुरांच्या मागण्या त्रोटक आणि सूत्ररूपाने नमूद केलेल्या होत्या. हे सर्व प्रश्न विशेषतः, **किमान वेतनाचा प्रश्न** शेतमजुरांच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न आहे. या समस्येच्या पार्श्वभूमीची माहिती व्हावी या दृष्टीने आम्ही हे निवेदन देत आहोत.

किमान वेतन संदर्भात काही महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे आहेत. १) महाराष्ट्रात १९९१ च्या जनगणनेनुसार एकूण शेतमजुरांची संख्या ८३,१३,००० होती. त्यापैकी पुरुष ३९,०६,००० आहेत, तर स्त्रिया ४४,०७,००० आहेत. म्हणजे शेतमजुरांमध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण अधिक म्हणजे ५३ टक्के आहे. तसेच एकूण शेतमजुरांमध्ये ४५ टक्के शेतमजूर हे अनुसूचित जाती जमातीचे आहेत. याचा अर्थ शेतमजुरांमध्ये समाजातील अतिदुर्बल घटक म्हणजे स्त्रिया, आदिवासी आणि दलित बहुसंख्येने आहेत. याशिवाय जंगलकाम, पशुसंवर्धन, शिकार, फळबागा इत्यादी क्षेत्रात ४,७२,००० मजूर काम करीत आहेत. हेही सर्व भूमिहीन आहेत. म्हणजे एकूण ८७,८५,००० ग्रामीण कृषी मजूर आहेत. महाराष्ट्रात १,०१,७२,००० शेतकरी आहेत. यातले ६७ टक्के हे अल्पभूधारक आणि अत्यल्पभूधारक आहेत. त्यातले अत्यल्पभूधारक आणि कोरडवाहू शेती करणारे अल्पभूधारकांना वर्षातून निदान ६ ते ८ महिने शेतमजुरी करावी लागते. कारण त्यांच्या तुटपुंज्या शेतीतून पुरेसे अन्नधान्य पिकत नाही. महाराष्ट्रात एकूण मुख्यत: काम करणारे ३,१०,०६,००० आहेत. आणि त्यापैकी ५० टक्क्यांपेक्षा अधिक जणांना शेतमजुरीवर निर्वाह करावा लागतो, असा याचा अर्थ होतो. महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्या ७,८७,४८,२१५ एवढी आहे. त्या लोकसंख्येत किमान वेतनावर अवलंबून असणाऱ्यांत शेतमजूर, अत्यल्पभूधारक आणि अल्पभूधारक जवळजवळ ५ कोटी आहेत. महाराष्ट्र राज्यात प्रचंड संख्येने असलेल्या या शेतीतल्या कष्टकऱ्यांचे जीवनमान शेतमजुरांसाठी ठरविलेल्या किमान वेतनांवर सर्वस्वी अवलंबून आहे ही अतिमहत्त्वाची बाब दृष्टीआड करता येणार नाही.

## २. किमान वेतन दारिद्र्यरेषेखाली

दिनांक २९ जून, १९९४ रोजी शासनाने काढलेल्या जाहीरनाम्याप्रमाणे शेतमजुरांसाठी किमान वेतन.

| | |
|---|---|
| परिमंडळ एक प्रतिदिन · | रु. २९/- |
| परिमंडळ दोन प्रतिदिन | रु. २६/- |
| परिमंडळ तीन प्रतिदिन | रु. २३/- |
| तर परिमंडळ चार प्रतिदिन | रु. २०/- |

ठरविलेले आहे. नियोजन मंडळाने ठरविलेली दारिद्र्यरेषा रु. ११,४०० ची आहे.

महाराष्ट्रातील सर्व शेतमजुरांना वर्षातील सर्वच्या सर्व ३६५ दिवस काम मिळाले असे गृहीत धरले तरी चारही परिमंडळामध्ये ठरवून दिलेले किमान वेतन दारिद्र्यरेषेखालीच आहे. वर्षाचे ५२ रविवार आणि २६ जानेवारी, १५ ऑगस्ट, दसरा वगैरे कायदेशीर सुट्ट्यांचा विचार केला तर दारिद्र्यरेषेपेक्षा किमान वेतन निश्चितच खूप कमी आहे. वस्तुत: शेतमजुरांना सर्व दिवस रोजंदारीचे काम मिळत नाही. वर्षामध्ये जेमतेम १२० ते १५० दिवस मजुरी मिळते. या वास्तवाचा विचार केला तर दारिद्र्यरेषेच्या निम्म्यापेक्षाही कमी उत्पन्न शेतमजुरांना प्राप्त

होते असेच म्हणावे लागते. दारिद्र्यरेषा ठरवली तेव्हापासूनचा जर विचार केला तर असे दिसून येते की, किमान वेतनापासून शेतमजुराला मिळू शकणारे वार्षिक उत्पन्न दारिद्र्य रेषेपेक्षा किती तरी नेहमीच कमी राहिले आहे.

दारिद्र्यरेषेखाली शेतमजुरांचे किमान वेतन ठरविणे हे योग्य नाही. कायद्याचा विचार आपण क्षणभर बाजूला ठेवला तरी हे निश्चितच माणुसकीला सोडून आहे. मानवी हक्कांची यात पायमल्ली होते. तसेच जगून राहण्यासाठी आवश्यक असलेल्या धान्य खरेदी करण्याची शेतमजुरांची क्रयशक्ती हिरावून घेतल्याने त्यांची बायकामुले कुपोषणाची बळी ठरतात. आदिवासी भागातून कुपोषणाला बळी पडल्याबद्दलच्या घटना वारंवार उघडकीस येत आहेत. महाराष्ट्र राज्य सरकारला हे लाजीरवाणे आहे. दारिद्र्यरेषेखाली किमान वेतन ठेवण्याची जुन्या काँग्रेस सत्ताधाऱ्यांची परंपरा नवे सरकार खंडित करेल अशी आशा शेतमजुरांना वाटत आहे.

३. श्री. बाळासाहेब विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशी विचारात घेऊन २२ एप्रिल १९८८ च्या जाहीरनाम्याने परिमंडळ एकमध्ये रु. २०/-, परिमंडळ दोनमध्ये रु. १६/-, परिमंडळ तीनमध्ये रु. १२/- किमान वेतन ठरविण्यात आले. विखे-पाटील कमिटीने अशी शिफारस केली होती की, दर दोन वर्षांनी शेतमजुरांच्या किमान वेतनाची पुनर्रचना केली जावी, अथवा महागाई निर्देशांकात ५० अंकानी वाढ झाली, तर किमान वेतनाची पुनर्रचना करण्यात यावी. या शिफारशीप्रमाणे नंतर दोन वर्षांनी म्हणजे २१ एप्रिल, १९९० ला पुनर्रचना करावयास पाहिजे होती. तसेच त्यानंतर २१ एप्रिल १९९२ ला दुसऱ्यांदा आणि २१ एप्रिल, १९९४ ला तिसऱ्यांदा शेतमजुरांच्या किमान वेतनाची पुनर्रचना करावयास हवी होती. मे, १९८८ मध्ये निर्देशांक ७७७ होता तो डिसेंबर १९९२ मध्ये १३६७ झाला. म्हणजे निर्देशांक ५९० ने वाढला. विखे-पाटील कमिटीची शिफारस प्रामाणिकपणे मागील शासनाने अंमलात आणली असती तर नुसत्या निर्देशांकाचा विचार केला तरी शेतमजुरांच्या किमान वेतनात डिसेंबर ९२ पर्यंत अकरा वेळा पुनर्रचना करावी लागली असती. थोडक्यात, पूर्वीच्या शासनाने स्वतःच नेमलेल्या विखे-पाटील कमिटीच्या मूलभूत शिफारशी चक्क धाब्यावर बसवलेल्या आहेत. त्यामुळे शेतमजुरांवर फार मोठा सततचा अन्याय झाला आहे.

४. किमान वेतन कायदा १९४८ चे कलम ३ पोटकलम (२बी) नुसार ठरविलेल्या किमान वेतनाचा पुनर्विचार योग्य वाटेल अशा कालावधीत केला पाहिजे. हा कालावधी ५ वर्षांपेक्षा जास्त असता कामा नये. या कायदेशीर तरतुदीचा जरी विचार केला असता तरी २२ एप्रिल, १९८८ रोजी जाहीरनाम्याने अंमलात आलेल्या शेतमजुरांच्या किमान वेतनाची पुनर्रचना कोणत्याही परिस्थितीत पाच वर्षात म्हणजे २१ एप्रिल १९९३ पर्यंत व्हावयास पाहिजे होती. किमान वेतन कायदा हा केंद्र सरकारचा कायदा आहे. पण या कायद्यातील तरतुदीचा भंग पूर्वीच्या शासनाने मुजोरपणे केला आणि शेतमजुरांचे किमान वेतन २१ एप्रिल १९९४ म्हणजे बरोबर सहा वर्षांनी ठरविले आहे. यामध्ये महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारच्या कायद्याचा उघडउघड भंग केला असल्याचे स्पष्ट होते.

५. डॉ. सी. एस. हनुमंतराव यांच्या अध्यक्षतेखालील सर्वपक्षीय ग्रामीण मजूर राष्ट्रीय आयोगाने ३१ जुलै १९९१ रोजी सादर केलेल्या अहवालात शिफारस केली आहे की, प्रत्येक सहा महिन्यांनी महागाई वाढली की, वाढलेल्या निर्देशांकाचे आधारावर आपोआप किमान वेतन वाढवावे. तसेच दर दोन वर्षांनी किमान वेतनाची पुनर्रचना करण्यात यावी. ३१ जुलै १९९१ च्या या शिफारशी या पूर्वीच्या महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या विखे-पाटील कमिटीच्या २२ एप्रिल, १९८८ च्या शिफारशीशी तंतोतंत जुळणाऱ्या आहेत. विखे-पाटील कमिटीच्या याबाबतच्या शिफारशींना जसे महाराष्ट्र शासनाने जुमानले नाही त्याप्रमाणे राष्ट्रीय ग्रामीण मजूर आयोगाच्या शिफारशींना महाराष्ट्र शासनाने केराची टोपली दाखवली आहे.

६. ग्रामीण मजूर राष्ट्रीय आयोगाने आपल्या ३१ जुलै १९९१ च्या अहवालात अशीही एक महत्त्वाची शिफारस केली होती की, शेतमजुरांचे मूळ किमान वेतन डिसेंबर १९९० ला कमीतकमी रु. २०/- असावे. राज्य सरकारने रु. २०/- पेक्षा जास्त किमान वेतन ठरविले तर त्यांची हरकत नाही परंतु कोणत्याही परिस्थितीत रु. २०/- पेक्षा कमी वेतन राज्य सरकारने ठरवू नये, असे या अहवालात स्पष्टपणे नमूद केले आहे. महाराष्ट्र शासनाकडे हा अहवाल आला पण शेतमजुरांबाबत शासन उदासीन व थंड राहिले. या शिफारशींची अंमलबजावणी जर झाली असती तर डिसेंबर १९९० लाच महाराष्ट्रातील परिमंडळ ४ मध्ये रु. २०/- किमान वेतन ठरवले गेले असते. पण महाराष्ट्र शासनाने ३१ जुलै १९९१ च्या अहवालाची अंमलबजावणी २९ जून १९९४ ला म्हणजे जवळजवळ तीन वर्षांनी केली. परिमंडळ चारमधील किमान वेतन रु. २०/- ठरविले. आणि मग त्या प्रमाणात परिमंडळ एक, दोन, तीनमध्ये वाढ केल्याचे दिसून येते. या ३ वर्षांच्या कालावधीत निर्देशांकांत खूप वाढ झाली आहे. त्यामुळे परिमंडळ ४ मधील पूर्वीचे किमान वेतन १२ चे २० झाले तरी शेतमजुरांच्या पदरात प्रत्यक्षात काहीच पडले नाही. भरमसाठ महागाईने त्याचे, किमान वेतन प्रत्यक्षात खूप घटले होते. त्यातील थोडी घट कमी झाली, एवढेच म्हणता येईल. अशाप्रकारे महाराष्ट्रातील शेतमजुरांची जीवघेणी क्रूर चेष्टा महाराष्ट्रातील तेव्हाच्या तथाकथित पुरोगामी शासनाने केली आहे.

७. महाराष्ट्र राज्यात शेतमजुरांसाठी कायद्याने अस्तित्वात असलेले किमान वेतन इतर राज्यातून शेतमजुरांना मिळणाऱ्या किमान वेतनाची तुलना केली तर आपल्यापुढे एक वेगळेच चित्र उभे राहते. राजस्थानमध्ये शेतमजुरांचे किमान वेतन रु. ३५/- ठरविले आहे. तर ओरिसासारख्या लहान व मागासलेल्या राज्यात किमान वेतन रु. २५/- आहे.

यावरून हे उघड होते की, तेव्हाच्या महाराष्ट्र शासनावर धनिक शेतकऱ्यांचे जबरदस्त वर्चस्व असल्याने महाराष्ट्रातील शेतमजुरांचे किमान वेतन इतर राज्यांपेक्षाही कमी राहिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आणि महात्मा फुले यांचा उठसूट जप करणारे तेव्हाचे महाराष्ट्र शासन कितीही पुरोगामीपणाची प्रौढी मिरवत असले तरी ते शेतमजुरांचे बाबतीत प्रतिगामी होते हेच यावरुन सिद्ध होते.

८. शेतमजुरांप्रमाणे ग्रामीण भागात श्रमणारे बांधकाम खात्याचे सार्वजनिक रस्त्यांवर वगैरे काम करणारे कामगार आहेत. तसेच वनखात्यात काम करणारे कामगार आहेत. पण ते संघटित आहेत. शिवाय ते शासनाच्या दोन महत्त्वाच्या खात्यांचे आहेत. त्यांना मिळणाऱ्या किमान वेतनाबरोबर महागाई भत्ता मिळतो.

महाराष्ट्रातील बांधकाम कामगारांना शासनाच्या निर्णयानुसार किमान वेतन व सोबत महागाई भत्ता मिळून किमान वेतन ठरविण्यात आले. दर सहा महिन्यांनी जानेवारी ते जूनसाठी जुलै महिन्यात आणि जुलै ते डिसेंबर या महिन्यासाठी जानेवारी महिन्यात वाढलेल्या महागाई निर्देशांकाचा विचार करून सहा महिन्यांची सरासरी काढून प्रत्येक झोनसाठी महागाई भत्त्याचे वेगवेगळे दर ठरविले जातात. खात्याच्या कामगारांसाठी डिसेंबर १९९४ अखेर जानेवारी ९५ मध्ये किमान वेतन आणि महागाई भत्ता खाली नमूद केल्याप्रमाणे दिला जात आहे. हे खरे आहे की, शेतमजूर हे असंघटित आहेत. ते किमान वेतनासाठी एकत्र येऊन संघर्ष करू शकत नाहीत. पण याचे मूलभूत कारण हे आहे की, शेतमजूर हे दोन दोन, तीन तीन असे शेतकऱ्यांकडे मजुरीला असतात. तेव्हा लाखो शेतकऱ्यांकडील विखुरलेले शेतमजूर संघटित होण्यामधील अडचणी राज्य शासनाने लक्षात घेणे आवश्यक आहे, याचा सहानुभूतीने विचार करून संघटित मजुरांना मिळणारे सर्व फायदे शेतमजुरांना मिळवून देण्याचे खास प्रयत्न कल्याणकारी शासनाने करणे आवश्यक आहे. तसेच किमान वेतन कायद्याचाही हा एक प्रमुख उद्देश आहे हे लक्षात ठेवावे लागेल.

| झोन नंबर ३ | रोजंदारीचा दर | खास भत्ता | एकूण |
|---|---|---|---|
| अकुशल | रु. १०-०० | रु. ५४-६० | रु. ६४-६० |

बांधकाम कामगाराचा खास भत्ता (महागाई) १-१०-८४ ते ३१-६-८४ ला अवघा रु. ३-४० होता. तो आता वाढून ३१-१२-९५ ला रु. ५४-६० झाला आहे. म्हणजे रु. ५१-२० ची वाढ झाली आहे.

जंगल खात्याकडे काम करणाऱ्या वनवाटिकेतील कामगारांचे किमान वेतन १५ मे, १९८६ च्या सरकारी निर्णयाने ठरविण्यात आले आहे. या मजुरांनाही वेतनासोबत खास भत्ता दिला जातो. मुंबई ग्राहक निर्देशांक (नवा) ६०४ वर आधारित हा खास भत्ता आहे. बारा महिन्यांत निर्देशांकात झालेली वाढ लक्षात घेऊन त्याची सरासरी काढून प्रत्येक ५ अंक वाढीसाठी प्रतिदिन १० पैसे या प्रमाणे महागाई भत्ता वाढवून देण्यात येतो. दरवर्षी ऑगस्टमध्ये ऑगस्ट ते जुलै या काळासाठी खास भत्ता जाहीर केला जातो. ऑगस्ट १९९४ ते जुलै १९९५ या वर्षाचा विचार करून १ ऑगस्ट ९४ रोजी खास भत्ता ठरविलेला आहे. वनमजुरांना मिळणारा सध्याचा वेतन दर खालीलप्रमाणे आहे.

| वर्गवारी | वेतन दर (रु.) | दर दिवसासाठी भत्ता (रु.) | एकूण वेतन (रु.) |
|---|---|---|---|
| कुशल | १८-०० | १६-१० | ३४-१० |
| अकुशल | १६-०० | १६-१० | ३२-१० |
| अकुशल हलके | १४-०० | १६-१० | ३०-१० |

वन कामगारांना ऑगस्ट ८६ ते जुलै ८७ चा खास भत्ता अवघा रु. ०-४० होता तो वाढता वाढता आता रु. १६-१० झाला आहे. पण ग्रामीण भागातच काम करणाऱ्या शेतमजुरांना मात्र आता २९ जून १९९४ पासून फक्त किमान वेतन रु. २०/- ते २९/- मिळू लागले आहे. त्यांच्या तुलनेत ग्रामीण भागातील अकुशल वन कामगारांना आणि बांधकाम कामगारांना रोजंदारी अनुक्रमे रु. ३४-१० आणि रु. ६४-६० आहे. रोजंदारीतला हा फरक नक्कीच जाणवणारा आणि अस्वस्थ करणारा आहे.

९. केंद्र सरकारातील आणि विविध राज्यातील सरकारी आणि निमसरकारी कर्मचाऱ्यांना गेले कित्येक दशके मूळ पगार आणि स्वतंत्र महागाई भत्ता मिळत आला आहे. त्यांना मिळणाऱ्या या महागाई भत्त्यात वेळोवेळी काही कालावधीनंतर वाढत्या निर्देशांकाचा विचार करून वाढ मंजूर केली जाते. संघटित कामगारांनाही याप्रमाणे मूळ पगाराशिवाय महागाई भत्ता मिळतो. वेगवेगळ्या व्यवसायातील कामगारांसाठी किमान वेतन ठरविण्यात आले आहे. आता त्यांना वाढत्या निर्देशांकाप्रमाणे खास भत्ता वाढवून दिला जातो. वाढत्या निर्देशांकाप्रमाणे मूळ वेतनाशिवाय खास भत्ता वाढवून देण्याचे धोरण स्वीकारले आहे. पण खेदाची बाब ही आहे की, महाराष्ट्रातील शेतमजुरांना मात्र हा न्याय लावला जात नाही. त्यांना फक्त किमान वेतनच दिले जाते. त्यांना महागाई भत्ता अजिबात दिला जात नाही. कारण शेतमजूर फार मोठ्या संख्येने आहेत. त्यातील बहुसंख्य अतिदुर्बल घटकांमधील आहेत. ते असंघटित आहेत म्हणून त्यांचेवर सतत होणारा अन्याय कदापिही समर्थनीय नाही. याही क्षेत्रात वेतनाबरोबर महागाई भत्ता देण्याचा शुभारंभ नव्या सरकारने करावा.

१०. अन्नधान्य आणि महत्त्वाच्या शेतीमधील पिकांचे बाजारभावातील चढउतारामुळे शेतकऱ्यांचे भरमसाठ नुकसान होऊ नये म्हणून केंद्र सरकार आधार किंमती ठरवते. आधार किंमतीखाली बाजारभाव गेले तर या आधार किंमतीला माल खरेदी करण्याची हमी सरकारने दिलेली आहे. प्रत्यक्षात बाजारामध्ये आधार किंमतीपेक्षा कितीतरी जास्त भावाने शेतकऱ्यांचा माल खपतो. शेतकऱ्याच्या उत्पादन खर्चाचा विचार करून या आधार किंमती ठरविलेल्या असतात.

१९८८-८९ पासून १९९३-९४ पर्यंत केंद्र सरकारने ठरविलेल्या आधार किंमतीत खालील प्रमाणे वाढ झाली आहे.

| पीक | ८९-९० | ९०-९१ | ९१-९२ | ९२-९३ |
|---|---|---|---|---|
| भात भरड | १८५ | २०५ | २३० | २७० |
| भात उत्तम | १९५ | २०५ | २४० | २८० |
| ज्वारी बाजरी | १६५ | १८० | २०५ | २६० |
| रबी | | | | |
| मका | १६५ | १८० | २१० | २६५ |
| गहू | | | | |
| डाळ, तूर, मुग | ४२५ | ४८० | ५०५ | ६४० |
| भूईमुग शेंग | ५०० | - | ६४५ | ७५० |
| शेंगदाणे | - | ८१५ | ८८० | - |
| सोयाबीन पिवळे | ३७० | ४०० | ४४५ | ५२५ |
| सूर्यफुल | ५३० | ६०० | ६७० | ८०० |
| कापूस | ६९० | ७५० | ८४० | ९५० |
| कापूस इतर | ५७० | ६२० | ६९५ | ८०० |
| ऊस | २०० | २३० | २४० | |
| उतारा ८५% | -- | -- | -- | -- |

१९८८-८९ ते १९९३-९४ या कालावधीत आधार किंमतीत जवळजवळ दुप्पटीने वाढ झाली आहे. अन्न धान्य किंमतीच्या तुलनेत नगदी पिकांचे द्विदल धान्यांची तेलबियांच्या भावांमध्ये तर भरमसाठ वाढ झाली आहे. शेतकऱ्यांना आयकर भरावा लागत नाही. ज्या शेतकऱ्याच्या शेतावर शेतमजूर खपतात, त्यांचे उत्पन्नात तिप्पट वाढ आधार किंमतीचा विचार केला तरी झाली असल्याचे यावरून स्पष्ट होते.

**११.** सर्व कामगारांचे किमान वेतन निर्धारणासाठी पाच सदस्यांचे कुटुंब म्हणजे कामगाराची पत्नी व ३ इतर अवलंबित सदस्यांचे युनिट गृहित धरण्यात येते. यामध्ये इतर कोणत्याही कुटुंब सदस्याच्या उत्पन्नाचा विचार केला जात नाही. असे असताना शेतमजुरांच्या बाबतीत प्रत्येक कुटुंबात २ माणसे काम करतात असे गृहित धरले आहे. हे कशाच्या आधारावर? अनेक परित्यक्ता किंवा विधवा स्त्रिया एकट्याच शेतावर किंवा रोजगार हमी योजनांवर राबत आहेत. त्यांना किमान वेतन अर्धेच मिळते. ह्याचे कारण म्हणजे कुटुंबातील दोन सदस्य मिळवतात हा चुकीचा समज. तसेच स्त्रिया ह्या अकुशल व अर्धवेळ कामगार आहेत, असा मुद्दामच करून घेतलेला गैरसमज. रोजगार हमी योजनांवर काम करणाऱ्या व ग्रामीण स्त्री मजुरांना बाळंतपणाची भरपगारी रजा मंजूर होणे अत्यावश्यक व तातडीचे आहे.

१२. रोजगार हमी योजनेच्या निधीसंबंधात अत्यंत गंभीर तक्रार म्हणजे या निधीत प्रचंड वेगाने वाढ होत असतानाही प्रत्यक्षात शेतमजुराच्या किमान वेतनात काही सुधारणा होत नाहीत. याउलट अक्षरश: अब्जावधी रुपये या निधीतून परस्पर दुसऱ्या बेकायदेशीर कारणांसाठी वळविले जात आहेत. वास्तविक पाहता मध्यमवर्गीयांकडून व्यवसाय कराद्वारे जमा होणारा पैसा फक्त रोजगार हमी योजनेसाठी वापरावा, असे कायद्याचे बंधन आहे. जर का तो निधी एक वर्षासाठी अन्य शासकीय खात्याने वापरला तर त्यामधूनही ग्रामीण मजुरांसाठी रोजगार निर्मिती व्हावी अशी कायदेशीर तरतूद आहे. असे असताना १.५ अब्जाहून अधिक रुपये इतर असंबंधित गैरलागू योजनांसाठी वापरण्यात आले. यामध्ये ऊसउत्पादकांची कर्ज माफीही करण्यात आली. हा फौजदारी स्वरूपाचा गुन्हा आहे. संबंधित अधिकाऱ्यांना या गुन्ह्याबद्दल शासन होणे आवश्यक आहे. विस्तृत माहितीसाठी 'मणिबेन कारा' या संस्थेने केलेल्या अभ्यासाचा सारांश जोडीत आहोत.

एकीकडे रोजगार हमी योजनेवर कामे काढली जात नाहीत. काढल्यास ६० टक्के खर्च मजुरीवर करण्यात येत नाही. मजुरीचे वाटप अत्यंत विलंबाने करण्यात येऊन मजुरांना उपाशी ठेवण्यात येते. खोट्या हजेऱ्या लावून करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करून हा निधी गडप करण्यात येतो. या सर्वांच्या निषेधार्थ या वर्षात गेल्या वर्षी पुढीलप्रमाणे महत्त्वाच्या तज्ञ व सूज्ञ व्यक्तींनी चीड येऊन निषेधार्थ राजीनामे दिले होते. त्यांची नावे पुढीलप्रमाणे -

१) **प्रा. एच. एन. देसरडा** (सदस्य, रोजगार हमी योजना व नियोजन मंडळ)
२) **साहेबराव भारडकर** (अध्यक्ष, रोजगार हमी योजना विधानसभा समिती)
३) **केशवराव धोंडगे** (ज्येष्ठ सदस्य, रोजगार हमी योजना विधानसभा समिती)

१३. ऑगस्ट ९४ चे बाजारभावाने वरील सूत्रानुसार मिळण्यास पात्र असलेले किमान वेतन रु. ७८-६० होते. परंतु ही मागणी विविध कारणांमुळे व्यवहार्य ठरणार नाही. या निष्कर्षाला शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समिती त्यावेळी म्हणजे मार्च ९३ ला आली होती. केंद्र सरकारच्या श्रमिक मजूर आयोगाची शिफारस सर्वमान्य आणि पटणारी आहे, असा दृष्टिकोन त्यावेळी स्वीकारण्यात आला होता. आयोगाने सुचविल्याप्रमाणे ग्रामीण मजुरांना डिसेंबर १९९० मध्ये किमान वेतन म्हणून रु. २०/- मिळायला हवेत. त्या प्रमाणे महाराष्ट्रातील शेतमजुरांचे किमान वेतन ठरविताना सध्याच्या परिमंडळानुसार परिमंडळ ४ चे वेतन रु. २०/- ठरते. याच न्यायाने अन्य परिमंडळाचे किमान वेतन खाली दर्शविल्याप्रमाणे होईल.

| परिमंडळ | सध्याचे किमान वेतन (म्हणजे मार्च ९३ला मिळणारे) (रुपये) | डिसेंबरमध्ये होणारे किमान वेतन (रुपये) |
|---|---|---|
| १ | २० | ३३ |
| २ | १६ | २७ |
| ३ | १४ | २३ |
| ४ | १२ | २० |

ग्रामीण मजुरांना राष्ट्रीय आयोगाच्या शिफारशीप्रमाणे दर सहा महिन्यांनी वाढणाऱ्या महागाईनुसार खास भत्ता द्यावयाचा आहे. केंद्रीय स्तरांवरील मजुरांसाठी वाढलेल्या महागाईची भरपाई प्रत्येक वाढलेल्या निर्देशांकाप्रमाणे रु. १६५ दरमहा या दराने केंद्र सरकार करते. दर महिन्याचे २६ कामाचे दिवस धरून हिशेब केला तर एका निर्देशांकाला प्रत्येक दिवसाला ६$\frac{१}{२}$ पैसे येतात. दर महिन्याचे ३० दिवस धरून हिशेब केला तर एका निर्देशांकाला प्रत्येक दिवसाला ५$\frac{१}{२}$ पैसे येतात. महाराष्ट्र राज्यात बांधकाम कामगारांना प्रत्येक वाढीव निर्देशांकास प्रति पॉइंट ५ पैसे सध्या देण्यात येतात. वर दर्शविलेल्या केंद्र सरकारच्या हिशोबास हे जवळपास जुळते आहेत. जानेवारी ९१ ते जून ९२ या कालावधीत तीन सहामाही होतात. या प्रत्येक सहामाहीमध्ये वाढलेल्या निर्देशांकाच्या विचार केला तर प्रति पॉइंट पैसे ५ या हिशोबाने देय महागाई भत्ता खालीलप्रमाणे होतो.

| तपशील | जाने. ९१ ते जून ९१ | जुलै ९१ ते डिसेंबर ९२ | जाने. ९३ ते जुलै ९३ |
|---|---|---|---|
| वाढलेला निर्देशांक<br>महागाई भत्ता | ६७<br>रु. ३-३५ | १०७<br>रु. ५-३५ | ६७<br>रु. ३-३५ |

या हिशोबाने वर उल्लेख केलेल्या १.५ वर्षाच्या कालावधीसाठी शेतमजुराला मिळायला पाहिजे असा भत्ता खालीलप्रमाणे होईल.

**डिसेंबर ९० ते जून ९२ पर्यंत वाढलेला महागाई निर्देशांक**

| | परिमंडळ १ | परिमंडळ २ | परिमंडळ ३ | परिमंडळ ४ |
|---|---|---|---|---|
| | ३३०<br>१४४<br>१२-०५ | २७०<br>१४४<br>१२-०५ | २३०<br>१४४<br>१५-०५ | २००<br>१४४<br>१२-०५ |
| एकूण महागाईसह किमान वेतन | रु. ४५-०५ | रु. ३९-०५ | रु. ३५-०५ | रु. ३२-०५ |

शेतमजूर आणि रोजगार हमी योजना कामगार समन्वय समितीने मार्च १९९३ मध्ये वर दर्शविलेल्या महागाईसह किमान वेतन ४ परिमंडळामध्ये मिळावे म्हणून मागणी केली होती. तसे सविस्तर निवेदनही शासनाकडे पाठविले होते. त्या निवेदनाची एक प्रत सोबत संदर्भासाठी ठेवली आहे.

**१४.** किमान वेतनाच्या या मागणीसाठी तसेच शेतमजुरांच्या अन्य मागणीसाठी शेतमजूर आणि रोजगार हमी योजना कामगार समन्वय समितीमध्ये समाविष्ट असलेल्या विविध संघटनांनी २० एप्रिल ९३ रोजी शेतमजुरांचा प्रचंड मोर्चा काढला होता. त्या मोर्चात

सुमारे २० हजार शेतमजूर सामील झाले होते. त्यावेळच्या काँग्रेस शासनाचे मुजोर मजूरमंत्री त्या मोर्चाला सामोरे तर आले नाहीतच पण मोर्चाच्या शिष्टमंडळाला भेटायलाही त्यांनी सवड काढली नव्हती. मजूरमंत्र्यांच्या या बेमुर्वतखोरपणाचा निषेध करण्यासाठी लाक्षणिक सत्याग्रह त्यावेळी केला होता आणि निवडक लोकांनी अटक करून घेतली होती.

**१५.** २० एप्रिल १९९३ च्या मोर्चानंतर तेव्हाच्या काँग्रेस सरकारने घाईघाईने एकतर्फी किमान वेतनाचे पुनर्निर्धारण करणाऱ्या जाहीरनाम्याचा मसुदा ३० डिसेंबर १९९३ ला जारी केला. आणि हरकती सूचना मागविल्या. या जाहीरनाम्याला हरकती घेणाऱ्या सूचना करणारी निवेदने शेतमजुरांमध्ये कार्य करीत असलेल्या संघटनांनी किमान वेतन सल्लागार मंडळाकडे दाखल केली होती. शासनाने देऊ केलेली प्रस्तावित वाढ कोणत्या प्रमुख कारणांसाठी समन्वय समितीला मान्य करता येत नाही याबद्दलचे एक निवेदन तेव्हाचे मा. मुख्यमंत्रीमहोदयांना ५ एप्रिल १९९४ रोजी दिले होते. या निवेदनाची एक प्रत माहितीसाठी सोबत ठेवलेली आहे. किमान वेतनाचा रेंगाळलेला प्रश्न विधानसभेत आज सत्तेवर आलेल्या पण तेव्हा विरोधी पक्षात असलेल्या आमदारांनी मोठ्या हिरीरीने मांडला होता. मा. मजूरमंत्र्यांनी दारिद्र्यरेषेवरील किमान वेतन ३१ मार्च, ९४ पर्यंत ठरविण्यात येईल असे भरघोस आश्वासन विधानसभेत दिले होते.

१६. १९ संघटनांनी पाठविलेल्या सूचनांची चर्चा किमान वेतन सल्लागार मंडळात झाली. मंडळाच्या सर्व सदस्यांनी एकमताने निर्णय घेऊन काही सूचना महाराष्ट्र शासनाला केल्या होत्या. त्यापैकी तीन महत्त्वाच्या सूचना खालीलप्रमाणे होत्या.

१) शेतमजुरांचे किमान वेतन निर्धारित करताना डिसेंबर १९९२ चा ग्रामीण ग्राहक निर्देशांकाचा आधार न घेता डिसेंबर १९९३ चा निर्देशांक लक्षात घ्यावा.

२) दरवर्षी १ मेला त्या वर्षाचा महागाई निर्देशांक लक्षात घेऊन शेतमजुरांचे किमान वेतन सुधारण्यात यावे.

३) हंगामी नोटिफिकेशनमध्ये जाहीर केलेल्या दरामध्ये सुधारणा करण्यात यावी.

वर उल्लेख केलेल्या ३० डिसेंबर ९३ च्या किमान वेतन पुनर्निर्धारण करणाऱ्या मसुद्याला विविध १९ घटनांनी घेतलेल्या हरकती, केलेल्या सूचनांकडे शासनाने लक्ष दिले नाही. त्याची साधी पोहोचही दिली नाही. तसेच या हरकतीवर चर्चा करून किमान वेतन सल्लागार मंडळाने एकमताने ज्या सूचना शासनाला केल्या होत्या, त्याचाही विचार न करता तेव्हाच्या महाराष्ट्र शासनाने एकतर्फी किमान वेतनाचे पुनर्निर्धारण करणारा जाहीरनामा २९ जून १९९४ ला काढला.

**१७.** २९ जून १९९४ च्या जाहीरनाम्याने ठरविलेले शेतमजुरांचे किमान वेतन, अशास्त्रीय पद्धतीने ठरविण्यात आले. महागाई निर्देशांकाचा विचार करणारे ते नाही तरी शेतमजुरांच्या व रोजगार हमी योजना कामगारांच्या किमान वेतनाची पुनर्रचना करण्यासाठी

तातडीने कमिटी नेमण्यात यावी अशी मागणी शेतमजूर आणि रोजगार हमी योजना समितीने आणि विविध संघटनांनी श्री. श्रावण पराते - तेव्हाचे मजूरमंत्री यांचेकडे निवेदन पाठवून ६ डिसेंबर १९९४ रोजी केलेली होती. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील शेतमजूरांच्या किमान वेतनाचे संदर्भात शेतमजूर आणि रोजगार हमी योजना कामगार समन्वय समितीच्या ताबडतोबीच्या खालील मागण्या आहेत.

१) ३१ डिसेंबर १९९२ चा निर्देशांक विचारात घेऊन निर्धारित केलेल्या किमान वेतनात ताबडतोबीने सुधारणा करण्यात यावी. किमान वेतन सल्लागार मंडळाच्या शिफारशीप्रमाणे ३१ डिसेंबर १९९३ चा निर्देशांक लक्षात घेऊन किमान वेतनात ताबडतोबीने वाढ द्यावी. तसेच १ जानेवारी ९४ ते ३१ डिसेंबर १९९४ या कालावधीत वाढलेल्या निर्देशांकाचा विचार करून शेतमजुराना खास भत्ता देण्यात यावा.

२) महाराष्ट्रातून शेतमजुरांचे किमान वेतन प्रथम धुळप समितीच्या शिफारशीप्रमाणे २८ ऑक्टोबर, १९७८ रोजी ठरविले होते. त्यानंतर पागे समितीच्या शिफारशीप्रमाणे ३१ जानेवारी १९८३ रोजी किमान वेतनाचे पुनर्निर्धारण करण्यात आले होते. त्यानंतर खासदार बाळासाहेब विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशीनुसार २२ एप्रिल १९८८ च्या जाहीरनाम्याने किमान वेतनाचे दुसऱ्यांदा पुनर्निर्धारण केले होते. पण त्यानंतर २९ जून १९९४ चे किमान वेतनाचे महाराष्ट्र शासनाने केलेले पुनर्निर्धारण एकतर्फी घाईघाईने केलेले आहेत. हे ठरविलेले किमान वेतन अपुरे, अशास्त्रीय, महागाई निर्देशांकाचा विचार न करणारे शेतमजूर संघटनांच्या मागण्यांचा विचार न करता किमान वेतन सल्लागार मंडळाच्या शिफारशी धुडकावून लावून केलेले आहे. तेव्हा शेतमजुरांच्या रोजगार हमी कामगारांच्या किमान वेतनाची पुनर्रचना करण्यासाठी तातडीने कमिटी नेमण्यात यावी. नेमण्यात येणाऱ्या कमिटीवर मालक व शेतमजूर संघटनांचे समान प्रतिनिधी असावेत. या कमिटीवर शेतमजुरांमध्ये गेली अनेक वर्षे कार्य करणाऱ्या शेतमजूर आणि रोजगार हमी योजना कामगार समन्वय समितीला प्रतिनिधित्व देण्यात यावे.

३) महाराष्ट्र राज्याच्या किमान वेतन सल्लागार मंडळावर शेतमजुरांमध्ये कार्य करणाऱ्या संघटनांचा एकही प्रतिनिधी नाही. या सल्लागार मंडळाची फेररचना करण्यात यावी. आणि त्यावर शेतमजूर आणि रोजगार हमी योजना कामगार समन्वय समिती (महाराष्ट्र)चा प्रतिनिधी नेमण्यात यावा.

४) महाराष्ट्र राज्याच्या किमान वेतन सल्लागार मंडळाच्या शिफारशी शासन कोणतेही कारण न देता धुडकावून लावते. ही बाब अनिष्ट आणि गंभीर आहे. सल्लागार मंडळाच्या शिफारशी मनमानीपणा करून धुडकावून लावण्याच्या कुप्रथेला यापुढे पायबंद घालावा. सल्लागार मंडळाची शिफारस मान्य केलीच पाहिजे पण जर ती अमान्य करायची असेल तर त्याची कारणे देण्याचे बंधन शासनाने पाळावे आणि त्याबद्दल विधानसभेत मजूरमंत्र्यांनी निवेदन करण्याची प्रथा सुरू करावी.

१८. शेतमजूर आणि रोजगार हमी कामगारांच्या किमान वेतनाच्या संदर्भातील वरील प्रमुख मागण्यांव्यतिरिक्त इतर महत्त्वाच्या मागण्या खालीलप्रमाणे आहेत.

१) शेतमजुरांना ठरविलेले किमान वेतन मिळत नाही. याबद्दलच्या तक्रारी वाढत आहेत. ठिकठिकाणी यावरून संघर्ष होत आहेत. तेव्हा किमान वेतन न देणे हा दखलपात्र गुन्हा ठरविण्यात यावा. जो शेतकरी किमान वेतन देणार नाही त्याला पत, पाणी, वीज नाकारण्यात यावी. त्यासाठी आवश्यक ती सुधारणा कायद्यात करण्यात यावी.

२) शेतमजूर स्त्रियांना किमान वेतन दिले जात नाही. कमी वेतन दिले जाते. त्यामुळे समान वेतन कायद्याचाही सर्रास भंग केला जात आहे. स्त्रियांचे काम पुरुषांपेक्षा कमी कौशल्याचे आहे असा दृढ समज समाजात आहे. उलट प्रत्यक्षात जास्त चिकाटीची आणि कुशलतेने शेतीची कामे स्त्रिया करतात असाच सर्वत्र अनुभव आहे. तेव्हा समान वेतन कायद्याची अंमलबजावणी करण्यात यावी. एकूण शेतमजूरांमध्ये मजूर स्त्रियांचे प्रमाण ५३ टक्के आहे. याचा विचार करून महिला मजूर निरीक्षक नेमण्याचा प्राधान्याने विचार करण्यात यावा.

३) गावोगावी शेतमजूर स्त्रियांना घरकाम, मुले बाळे सांभाळून, पिण्याचे पाणी, जळणाची सोय करून, नवऱ्याला शिदोरी बांधून देऊन मजुरीस जावे लागते. स्त्री मजुरांवरील कौटुंबिक आणि सामाजिक जबाबदारीचा योग्य विचार करावा. स्त्री शेतमजुरांचे कामाचे तास कायद्याने ५ तास ठरविण्यात यावेत. म्हणजे ५ तासाच्या कामाला पूर्ण दिवसाचे किमान वेतन स्त्री मजुरांना देण्यात यावे.

४) ग्रामीण शेतमजूर स्त्रियांना बाळंतपणाची भरपगारी रजा मंजूर होणे अत्यावश्वक आहे. तसेच या स्त्रियांना गर्भारपणात आणि त्यानंतर जोपर्यंत त्या मुलांना अंगावर पाजतात, त्या कालावधीत विशेष पौष्टीक आहार आणि जीवनसत्वे पुरवण्यात यावीत; जेणेकरून कुपोषणाला मातांचे, बालकांचे बळी पडणार नाहीत.

५) केरळ राज्याच्या धर्तीवर शेतमजुरांच्या सेवा शर्ती, त्यांची सामाजिक सुरक्षितता, शेतमजूर आणि जमीन मालक यांच्यातील वाद सोडविणेबद्दलची यंत्रणा वगैरेचा समावेश असलेला शेतमजुरांसाठी स्वतंत्र कायदा करण्यात यावा.

६) वयोवृद्ध भूमिहीन शेतमजूर स्त्री पुरुषांना शासनाची दरमहा पेन्शन देण्याची सध्याची योजना शास्त्रीय नाही. शेतमजुरांची व्यवस्थित व्याख्या करण्यात आलेली नाही. सध्या ६० व ६५ वयांच्या स्त्री आणि पुरुष शेतमजुरांना या योजनेचा लाभ मिळतो. शेतमजुरांना करावे लागणारे अहोरात्र कष्टाचे काम त्यांचे आयुर्मान विचार करता ५८ वर्षे ही मर्यादा ठरविण्यात यावी. तसेच सध्या दरमहा रु. १००/- पेन्शन देण्यात येते. ही रक्कम अत्यंत अपुरी असल्याने ती वाढवून रु. ५००/- करण्यात यावी.

७) प्रत्येक ग्रामपंचायत हद्दीमध्ये राहाणाऱ्या शेतमजुरांची नोंद करण्यात यावी. नोंदणीकार्ड त्यांना देण्यात यावे. या शेतमजूर कार्डधारकांना सरकारी दुकानातून सर्व जीवनावश्यक वस्तू माफक दरात पुरविण्यात याव्यात.

८) सध्या किमान वेतनासाठी महाराष्ट्रामध्ये ४ परिमंडळे निर्माण करून प्रत्येक परिमंडळासाठी वेगळे किमान दर ठरविण्यात आले आहेत. या पैकी परिमंडळ एक महानगरपालिका, बारमाही पाणीपुरवठा होणारी कमांड एरिया आणि परिमंडळ दोनमधील अ, आणि ब वर्गीय नगरपालिका वगैरे क्षेत्र एकत्र करून एक परिमंडळ करण्यात यावे. तर परिमंडळ ४ मधील अवर्षणप्रवण क्षेत्र आणि परिमंडळ १, २ व ४मध्ये समाविष्ट नसलेल्या क्षेत्राचा बनलेला परिमंडळ २ हे एकत्र करण्यात येऊन त्याचे एक परिमंडळ करण्यात यावे. अशा प्रकारे सध्याच्या ४ परिमंडळांचे ऐवजी फक्त दोन परिमंडळे किमान वेतनासाठी असावीत.

९) गावी काम मिळाले नाही की शेतमजूर हा स्थलांतरित होतो. तो कंत्राटदाराच्या तावडीत सापडतो आणि कंत्राटी मजूर बनतो. कंत्राटदार या स्थलांतरित मजुरांचे भयानक शोषण करतात. वेठबिगारींचे जीवन त्यांना कंठावे लागते. तेव्हा कंत्राटी मजूर पद्धत नष्ट करण्यासाठी कंत्राटी कायदा रद्द करण्यात यावा.

१०) रोजगार हमी योजना निधीत प्रचंड वेगाने वाढ होत आहे. पण प्रत्यक्षात रोजगार हमी योजनेची कामे सुरू करण्यात खळखळ केली जाते. मागणी करूनही काम मिळत नाही. काम सुरू केले तर त्यावर किमान वेतनाइतकीही मजुरी दिली जात नाही. पण या उलट अक्षरश: अब्जावधी रुपये या निधीतून परस्पर दुसऱ्या बेकायदेशीर कारणांसाठी वळविले गेले आहेत. यापूर्वीच्या काँग्रेस सरकारने ऊस उत्पादकांची कर्जे माफ करण्यासाठी या निधीतले कोट्यवधी रुपये वापरले आहेत. फळबाग योजनेसाठी हा निधी वापरण्यात आला आहे. रोजगार हमी योजनेचा निधी इतर कोणत्याही कारणासाठी सरकारने वापरता कामा नये. जेथे कामाची मागणी होईल तेथे ५ किलोमीटरचे आत विनाविलंब काम सुरू करण्यात यावे. या कामावरील मजुरांना किमान वेतनाइतकी मजुरी मिळेल अशी खबरदारी घेण्यात यावी. अत्यल्पभूधारक, अल्पभूधारकांच्या शेती विकासाची उत्पादक कामे प्राधान्यक्रमाने रोजगार हमी योजनेखाली घेण्यात यावीत.

११) निरनिराळ्या खात्यांतर्फे वन खाते, कृषी खाते वगैरे रोजगार हमी योजनेची कामे सुरू करण्यात येतात. पण त्या खात्याशी निगडीत असलेल्या कामाची ठरविलेली मजुरी या कामावर देण्यात येत नाही. या खात्याची होणारी कामे रोजगार हमी योजनेच्या कामावर दिल्या जाणाऱ्या किमान वेतनाशी जोडता कामा नयेत. खात्यामार्फत काम केल्यानंतर ज्या दराने मजुरी दिली जाते त्याच दराने अशा रोजगार हमी योजना कामांवर मजुरी देण्यात यावी.

१२) रोजगार हमीवरील हजेरी सहाय्यक वर्षानुवर्षे काम करत आहेत. पण त्यांची नोकरी अद्याप हंगामी ठेवण्यात आली आहे. रोजगार हमी योजना ही स्थिरावली आहे. ती बंद पडण्याची शक्यता नाही. तेव्हा हजेरी सहाय्यकांना नोकरीत कायम करण्यात यावे.

१३) शेतमजुरांना गावी काम मिळत नाही. त्यांना स्थलांतरित मजूर बनावे लागते. जेव्हा काम

मिळते तेव्हा त्यांना मिळणारे किमान वेतन कमी मिळते. परिणामतः त्यांची मुले बालमजूर होतात.

**१९.** शेतमजूर गावी रहातात. किमान वेतनाशी प्रत्यक्ष संबंधित नसलेले पण त्यांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या काही मूलभूत समस्या आहेत. हे प्रश्न जर सुटले तर त्यांचे जीवन सुसह्य होईल. गावी रहाण्यात त्यांना स्वारस्य वाटेल. स्थलांतरित झाले तरी गावी परत येतील. शहरातील झोपडपट्टीचा कायम आश्रय घेणार नाहीत. तेव्हा मजूर खात्याशी संबंधित नसलेल्या शेतमजुरांच्या काही मागण्या येथे मांडल्या आहेत. या समस्या सोडविण्याचा प्रयत्न संबंधित खात्यामार्फत करणे आवश्यक आहे.

१) गावी खूपसे शेतमजूर बेघर आहेत. तर काहींच्या झोपड्यांखालील जागेचे ते मालक बनलेले नाहीत. प्रचलित शासकीय धोरणांप्रमाणे घरे बांधून देण्यास ते पात्र ठरतात. तसेच बहुतेक शेतमजूर मागास वर्गाचे आहेत. त्यांच्या घराखालील जागा त्यांच्या मालकीच्या करण्यात खरे पाहता अडचण येण्याचे कारण नाही. त्यासाठी शासनाने खास ठराव केले आहेत. २० कलमी कार्यक्रमातही भूमिहीन बेघरांना घरे बांधून देण्याच्या कार्यक्रमाचा अंतर्भाव आहे. तरी शेतमजुरांना, अत्यल्पभूधारकांना घराखालील जागा मोफत देण्यात यावी. आणि काही प्रकरणांतून गरजेनुसार घरबांधणीसाठी आवश्यक ती सर्व मदत देण्यात यावी.

२) शेतमजुरीवर जीवन जगणाऱ्यांनी, मुक्त वेठबिगारांनी सरकारी जागेत अतिक्रमणे केली आहेत. त्यांची ही अतिक्रमणे बऱ्याच वर्षांची आहेत. जंगल जमिनीतूनही त्यांची ही शेतीसाठीची अतिक्रमणे आहेत. भूमिहीनांची सरकारी जमिनीमधील अतिक्रमणे नियमानूकुल करण्यात यावीत. अतिक्रमीत जमीन अतिक्रमक स्त्री पुरुषांच्या नावे मंजूर करावी व त्या जमिनीचा सातबारा दोघा पतीपत्नींच्या नावे देण्यात यावा.

३) टंचाईग्रस्त गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न युद्ध पातळीवर सोडविण्यात यावा. हा प्रश्न कायमस्वरूपी सुटण्यासाठी गावोगावी पाणलोट विकास कार्यक्रम राबविण्यात यावेत. लहान धरणे, बंधारे, पाझर तलाव, पाटबंधारे, जलसंधारणाची कामे वनीकरण या कामांवर भर देण्यात यावा. रोजगार हमी योजनेमध्ये अशा कामांचा अंतर्भाव करण्यात यावा.

ता. १३-६-९५ आपले नम्र

१) कॉ. संतराम पाटील - निमंत्रक
२) साथी सुभाष लोमटे - निमंत्रक
३) कॉ. रा. वि. भुस्कुटे
४) श्री. विवेक पंडित
५) कॉ. जीवनराव सावंत
६) कु. उल्का महाजन

# परिशिष्ट १

## काम करणाऱ्या लोकांची आर्थिक वर्गवारी - १९९१

| काम करणाऱ्यांचा वर्ग | महाराष्ट्र † | | | भारत ● | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. शेतकरी | ६,२३१ | ३,९४१ | १०,१७२ | ८८,४८१ | २२,२२१ | १,१०,७०२ |
| २. शेतमजूर | ३,९०६ | ४,४०८ | ८,३१३ | ४६,१६५ | २८,४३३ | ७४,५९८ |
| ३. पशुसंवर्धन, जंगलकाम, मच्छीमारी, शिकार, मळे, फळबागा वगैरे क्षेत्रात काम करणारे | ४०४ | ६८ | ४७२ | ४,७१६ | १,३२५ | ६,०४१ |
| ४. खाणकाम आणि दगड खाणकामात काम करणारे | ९८ | १७ | ११५ | १,५३७ | २१४ | १,७५१ |
| ५. वस्तुनिर्माण, प्रक्रिया, साधारण दुरुस्तीचे उद्योगधंदे करणारे | | | | | | |
| (अ) घरगुती उद्योगधंद्यात काम करणारे | ३३७ | १६२ | ४९८ | ४,५५५ | २,२४९ | ६,८०४ |
| (ब) घरगुती उद्योगधंद्याव्यतिरिक्त इतर उद्योगधंद्यात काम करणारे | ३,२५१ | ३४७ | ३,५९८ | १९,४१४ | २,४५३ | २१,८६७ |
| ६. बांधकाम करणारे | ७०९ | ९३ | ८०२ | ५,१२२ | ४२१ | ५,५४३ |
| ७ व्यापार आणि वाणिज्य क्षेत्रात काम करणारे | २,४०० | २५६ | २,६५७ | १९,८६३ | १,४३४ | २१,२९६ |
| ८ वाहतूक, साठवण आणि दळणवळण क्षेत्रातील काम करणारे | १,११६ | ४५ | १,१६० | ७,८१० | २०८ | ८,०१८ |
| ९ इतर कामे करणारे | २,४६८ | ७५१ | ३,२१९ | २३,९९५ | ५,३१६ | २९,३१२ |
| एकूण मुख्यत: काम करणारे | २०,९१९ | १०,०८८ | ३१,००६ | २,२१,६५९ | ६४,२७४ | २,८५,९३२ |
| सीमांतिक कामगार | ३७४ | २,५३० | २,९०४ | २,७०५ | २५,४९४ | २८,१९९ |
| एकूण काम न करणारे | १९,५२५ | २५,४८६ | ४५,०११ | २,१०,८४४ | ३,१३,५९२ | ५,२४,४३७ |
| एकूण काम करणारे आणि न करणारे | ४०,८१७ | ३८,१०४ | ७८,९२१ | ४,३५,२०८ | ४,०३,३६० | ८,३८,५६८ |

● जम्मू व काश्मीर वगळून.

† धुळे जिल्ह्यातील ३३ गावांची, जेथे जनगणना घेतली नाही, माहिती वगळून.

**टीप** - आकडे संक्षिप्तात लिहिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही.

**आधार** - महानिबंधक व गणना आयुक्त, भारत सरकार, नवी दिल्ली - १९९१ जनगणना प्राथमिक जनगणना सारांश (अंतिम) आणि एनआयसीनेट.

## परिशिष्ट २

### परिमंडळानुसार वेतन दर

| क्र | वर्ष | निर्धारित किमान वेतन प्रकार | झोन १ | झोन २ | झोन ३ | झोन ४ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १९७८ | अ) रोजंदार | ५-५० | ५-०० | ४-५० | ४-०० |
| २. | १९८३ | अ) रोजंदार | १०-०० | ८-०० | ७-०० | ६-०० |
| ३. | १९८८ | अ) रोजंदार | २०-०० | १६-०० | १४-०० | १२-०० |
| | | ब) महिनेदार | ६४०-०० | ५२०-०० | ४६०-०० | ४००-०० |
| | | क) सालदार | ७.६८०-०० | ६,२४०-०० | ५,५२०-०० | ४,८००-०० |
| ४. | १९८८ | ऊर्जा/वाफ/तेल इत्यादींवरील यंत्रे चालविणारे शेतमजूर | | | | |
| | | अ) रोजंदार | २४-०० | २०-०० | २०-०० | २०-०० |
| | | ब) महिनेदार | ८००-०० | ६४०-०० | ६४०-०० | ६४०-०० |
| | | क) सालदार | ९,६००-०० | ७,६८०-०० | ७,६८०-०० | ७,६८०-०० |
| ५. | १९९४ | अ) रोजंदार | २९-०० | २६-०० | २३-०० | २०-०० |
| | | ब) महिनेदार | ९३०-०० | ८६०-०० | ७६१-०० | ६६१-०० |
| | | क) सालदार | ११,१६०-०० | १०.३२० | ९,१३२-०० | ७,९३२-०० |

# रोजगार हमी योजना

महाराष्ट्राला पुन्हा एकदा तीव्र अवर्षणाचा तडाखा बसला आहे. राज्यातील फार मोठ्या विभागातील लोकसंख्येला उपासमारीला तोंड द्यावे लागणार आहे. आमच्या आधीच्या अहवालामध्ये आम्ही ज्या मुद्यांचा परामर्ष घेतला होता ते थोडे बाजूला सारून अवर्षणग्रस्त लोकांना ताबडतोबीने रोजगार पुरविण्यामध्ये राज्य सरकार जी क्रूर कुचराई आणि केविलवाणा कद्रुपणा दाखवत आहे, त्यावर प्रकाशझोत टाकून लोकांचे लक्ष तिकडे वेधण्याची आवश्यकता आहे, असे आम्हाला वाटते. ग्रामीण गरिबांचे दुःख दूर व्हावे हीच केवळ भावना त्यामागे आहे.

राज्यातील एकूण गावांपैकी ३/४ गावात नेहमीपेक्षा ५० टक्क्याहून पीक कमी आल्याने ती अवर्षणग्रस्त असल्याचे राज्य शासनाने जानेवारी १९९२ अखेरपर्यंत जाहीर केले होते. ग्रामीण भागात ज्याला म्हणून कामाची गरज आहे त्याला रोजगार पुरविणे हा रोजगार हमी योजनेचा हेतू आहे. हे अगदी उघड आहे की, ज्या वर्षी मोठ्या प्रमाणावर पिकांची हानी झाली आहे, त्या वर्षी नेहमीपेक्षा अधिक शेतमजूर कामाशिवाय रहाणार आहेत. शिवाय त्याच्यात खूप मोठ्या संख्येने शेतकरीही सामील होणार आहेत. बिगरशेती कामे मोठ्या

प्रमाणावर उपलब्ध होत नसल्याने रोजगारासाठी ग्रामीण भागात मागणी वाढणार हे उघड आहे. तथापि, सरकार मात्र अगदी थोड्यांनाच रोजगार पुरवत आहे. अवर्षणग्रस्त भागातील एकूण बाधीत व्यक्तीपैकी ३ टक्के लोकांनाही रोजगार हमी योजनेच्या कामावर रोजगार पुरविण्यात आलेला नाही.

| | |
|---|---|
| महाराष्ट्रातील वस्ती असलेली एकूण गावे | ३९,२५४ |
| १९९१ च्या खानेसुमारीप्रमाणे ग्रामीण लोकसंख्या | ४.८३ कोटी |
| अवर्षणग्रस्त म्हणून जाहीर केलेली गावे | २९,१५७ |
| अवर्षणग्रस्त गावातील अंदाजे लोकसंख्या | ३.५ कोटी |
| रोजगार हमी योजना कामावरील हजर मजूर (२५ जानेवारी १९९२). | ४.१० लाख |

१९९१-९२ मध्ये निर्माण केलेले मॅन डेज वर्क
(प्रत्येक मॅन डे ला रु. ३०/- गृहीत धरून)
अंदाजे १० कोटी मॅन डेज सर्व राज्यासाठी होतात.
म्हणजेच अवर्षणग्रस्त क्षेत्रासाठी प्रत्येक मुख्य
मजुराला (मॅन वर्कर) ७ दिवस होतात.

**रिझर्व बँक ऑफ इंडियाकडून ओव्हरड्राफ्ट घेण्यासाठी रोजगार हमी फंडाचा हमी (सिक्युरिटी) म्हणून उपयोग केला जातो.**

राज्यातील रोजगाराची एकूण गरज विचारात घेतली तर रोजगार हमी योजनेखाली निर्माण होणारा रोजगार अगदीच नगण्य आहे. अवर्षणाकडे पूर्णतया दुर्लक्ष करण्यात येत आहे. रोजगार हमी योजनेची शिल्लक रक्कम प्रचंड आहे. या फंडातील रक्कम कायद्याप्रमाणे रोजगार हमी कामांवरच फक्त खर्च केली पाहिजे. परंतु योजनेसाठी जमा झालेली रक्कम खर्च न करता ती सरकार वर्षानुवर्षे साठवून ठेवत आहे. उदाहरणार्थ १९९२-९३ च्या अंदाजपत्रकात रोजगार हमी योजनेसाठी होणारा खर्च रक्कम रु. ३०८.५५ कोटी दाखविली आहे तर या योजनेसाठी जमा होणारी रक्कम ६२०.१२ कोटी रुपये आहे. म्हणजेच यातील वाढावा रक्कम (६२०.१२ वजा ३०८.५५ = ३११.५७ कोटी रुपये) शिल्लक रु. ११२१.५७ कोटी मध्ये जमा होणार आहे.

ही प्रचंड शिल्लक रक्कम ११२१-५७ कोटी रुपये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियात नुसती पडून आहे. महाराष्ट्र राज्याला द्याव्या लागणाऱ्या ओव्हरड्राफ्टसाठी या रक्कमेचा हमी (सिक्युरिटी) म्हणून अर्थातच उपयोग करण्यात येत आहे.

रोजगार हमी कायद्यानुसार रोजगार हमी योजनेतून सतत रक्कमा काढून अन्य खर्च सरकारला करता येत नाही. रोजगार हमी योजनेसाठी जमा होणाऱ्या एकूण रक्कमेपैकी निम्म्यापेक्षा कमी रक्कम खर्च करून राहिलेली रक्कम रिझर्व्ह बँक ऑफ इंडियात शिल्लक ठेवून त्या प्रचंड शिल्लक रक्कमेचा सातत्याने दरवर्षी ओव्हरड्राफ्टसाठी हमी (सिक्युरिटी)

म्हणून वापर करणे याचा अर्थ रोजगार हमी रक्कम दुसऱ्या कामासाठी मागील दाराने उपयोगात आणणे असाच होतो.

(एक) व्यवसाय कर (दोन) महाराष्ट्र टॅक्स (सुधारणा) कायदा १९७५ प्रमाणे होणारी ३ टक्के वसुली, आणि (तीन) वरील एक आणि दोन प्रमाणे जमा होणाऱ्या एकूण रक्कमेइतकीच राज्य सरकारची रक्कम यामुळे दरवर्षी मिळणाऱ्या उत्पन्नातून रोजगारासाठी खर्ची पडणारी रक्कम मात्र दरवर्षी घटत आहे. व्यावसायिक कर हा तर विशेष करून विषम कर आहे. तो श्रीमंतांना नव्हे तर सामान्य कामगाराला जाचक आहे. व्यवसाय कराच्या प्रचलित दरानुसार दरमहा रु. ८००/- पगार मिळवणाऱ्या कामगाराला वर्षाला रु १२०/- भरावे लागतात. १९९०-९१ मध्ये व्यावसायिक कराची वसुली १८५ कोटी रुपये झाली. जी अंदाजपत्रकातील अंदाजाच्या ३५.४ कोटी रुपयांनी अधिक होती. त्या वर्षी फक्त १८४ कोटी रुपये रोजगार हमी योजनेसाठी खर्च दाखविण्यात आले होते. आणि बाकीची रक्कम शिल्लक रक्कमेत समाविष्ट करण्यात आली होती.

## रोजगार हमी योजना
## निष्प्रभ करण्याचे घातक धोरण

आमच्या चौकशीच्या कामात आम्ही मंत्रालयातील वेगवेगळ्या सरकारी अधिकाऱ्यांना भेटलो. रोजगार हमी योजनेबद्दलचा या अधिकाऱ्यांचा दृष्टिकोन आम्हाला भलताच आनंदी आणि आशावादी आढळून आला. प्रथम त्यांनी असा दावा केला की, रोजगार हमी योजनेमुळे महाराष्ट्रात ग्रामीण बेरोजगारीचा प्रश्न आता शिल्लक राहिलेला नाही. सहाय्य आणि पुनर्वसन खात्याचे श्री. वाडेकरांनी दोघा संशोधक सहाय्यकांना सांगितले की, रोजगार हमी कायदा १९७७ मुळे राज्यातील बेरोजगारी पूर्णतया नष्ट झाली आहे.

यापेक्षा अधिक मजेची गोष्ट म्हणजे, त्यांनी असा दावा केला की, रोजगार हमी योजनेखालील कामांना आता फारशी मागणीच नाही. त्यांनी असा मुद्दा मांडला की, जर रोजगार हमी योजना कामासाठी मागणी असती तर रोजगार हमीची कामे आपोआप सुरू झाली असती, तसेच रोजगार हमी योजनेखालील चालू असलेल्या कामावरील हजर कामगारांच्या संख्येत वाढ झाली असती. वस्तुस्थिती ही आहे की, नवीन रोजगार हमीचे काम चालू करायचे असेल तर कमीतकमी ५० मजुरांना कामाची मागणी केली पाहिजे. पण ५० मजूर एकत्र मिळाले नाहीत तर काम मागणाऱ्या मजुरांना जिल्ह्यात जेथे कोठे काम चालू असेल तेथे लांबवरचा प्रवास करून काम करायला सांगितले जाते. याबाबत अधिक तपशिलात गेले नाही तरी एक गोष्ट प्रकर्षाने समजून येते की, स्थानिक अधिकारी काम मागणाऱ्या ग्रामीण गरिबांना 'मामा' (मूर्ख) बनवतात. तीव्र अवर्षण वर्षातही रोजगार हमी योजनेखालील चालू असलेल्या कामावरील हजर मजुरांची संख्या वाढत नाही ही

वस्तुस्थितीच मूळी हे उघड उघड दाखवून देते की रोजगाराची मागणी निर्दयपणे दडपून टाकण्यात येत आहे.

रोजगार हमी योजना फंडाच्या प्रचंड शिल्लक रक्कमेचे मग काय होते? १९९२-९३ च्या अंदाजपत्रकानुसार रोजगार हमी फंडाची शिल्लक रक्कम ११२१-५७ कोटी रुपयांपर्यंत पोहचली आहे. तेव्हा काही सरकारी अधिकाऱ्यांच्या मते महाराष्ट्र सरकार नजीकच्या भविष्यात असे विधेयक आणेल की, रोजगार हमी कामाची मागणी नसल्याने (अर्थातच सरकारच्या मताप्रमाणे) रोजगार हमी फंडाची रक्कम सामान्य हिशेब सदरात (जनरल अकौंट) जमा करून टाकावी. या बाबतीत एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यावी लागेल. भारतीय अर्थव्यवहाराची दिवसानुदिवस अधिकाधिक व्यवस्था पाहाणाऱ्या जागतिक बँकेने महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेवरील एकूण होणारा खर्च कमी करावा. रोजगाराचा दैनंदिन दिला जाणारा दर म्हणजे मजुरी कमी करावी. योजनेखालील लाभ क्षेत्र कमी करावे तसेच ही योजना गुंडाळण्याच्या शक्यतेच्या प्रस्तावाचाही विचार करण्यात यावा अशी शिफारस केली आहे. (इंडिया, पॉव्हर्टी, एम्प्लॉयमेंट ॲन्ड सोशल सर्व्हिसेस १९८०).

## खर्चातील मजुरीवर केल्या जाणाऱ्या खर्चाचे प्रमाण घटत आहे

रोजगार हमी योजनेच्या खर्चाच्या वाटणीमध्ये अस्वस्थ करून सोडणारा बदल होत आहे. रोजगार हमी योजनेखालील कामातून श्रमाचे महत्त्व असले पाहिजे. की, ज्यामुळे जास्तीतजास्त रोजगार उपलब्ध झाला पाहिजे. परंतु प्रत्येक वर्षी रोजगार हमी योजनेमधील कामांवर होणाऱ्या एकूण खर्चापोटी निव्वळ मजुरीपोटी होणारा खर्च घटत आहे. १९७५-७६ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे मजुरीवरील खर्चाचे प्रमाण ९१ टक्के होते. ते घटत घटत १९९१-९२ मध्ये ५६ टक्के झाले आहे. अशी एक शंका निर्माण होते की, वन किंवा इरिगेशन खात्याच्या काही खर्चाची रक्कम रोजगार हमी योजनेच्या खर्चाच्या सदरी तर दाखवली जात नाही ना? असे जर नसेल तर रोजगार हमी खर्चामधील मजुरीवरील खर्चाचे प्रमाण का कमी होत आहे?

दुसरे एक महत्त्वाचे कारण असण्याचा संभव आहे. ते म्हणजे रोजगार हमी योजनेखाली सुरू केलेल्या दुसऱ्या योजना! उदाहरणार्थ बागकाम (हॉर्टिकल्चर) ज्या योजनेमध्ये अल्प आणि मध्यम भूधारकांकडील जमिनीवर रोजगार हमी योजनेचे हे काम मोफत म्हणजे १०० टक्के अनुदान देऊन केले जात आहे. तर ९० टक्के अनुदान देऊन या योजनेचा लाभ श्रीमंत शेतकऱ्यांना मिळत आहे. साहजिकच (एक) ही योजना टिकावू होण्यासाठी जास्त जमिनीचा कब्जा असणे गरजेचे ठरते. (दोन) या योजनेनुसार प्रत्यक्ष उत्पन्न सुरू होण्यासाठी काही कालावधी लागतो, (जेस्टेशन पिरीअड) आणि या अशा बागायतीला पुरेशा पाण्याचा आणि भांडवलाचा सतत पुरवठा लागत असल्याने ९० टक्के अनुदान मिळणाऱ्या या योजनेचा लाभ मोठ्या प्रमाणावर साहजिकच श्रीमंत शेतकरीच फक्त घेऊ शकतात. त्यांना

ही मोठी पर्वणीच आहे. हे अगदी स्वच्छ आणि स्पष्ट आहे की, रोजगार हमी योजनेचे उद्दिष्ट लक्षात घेता ही बागकाम योजना अयोग्य आहे. वस्तुस्थिती ही आहे की, अवर्षणग्रस्त क्षेत्रीय कार्यक्रमात कोणत्या कार्यक्रमांचा अंतर्भाव करू नये याची जी यादी दिली आहे, त्यामध्ये बागकामा(हॉर्टिकल्चर)चा खास करून उल्लेख केलेला आहे.

१९९०-९१ मध्ये बागकामाचा अंतर्भाव रोजगार हमी योजनेत करण्यात आला, आणि त्या वर्षीच रोजगार हमी योजनेच्या २३५ कोटी रु. खर्चापैकी ३१.१ कोटी रुपये या योजनेवर खर्चही करण्यात आले. या तुलनेत 'श्रमशक्तीद्वारा ग्राम विकास' ज्या योजनेमुळे गावाचा सर्वांगीण विकास साधावा अशी अपेक्षा आहे, त्या योजनेला मात्र १९९०-९१ मध्ये अवघे २.८३ कोटी रुपये मिळाले. आणि आज या योजनेखाली ७१० कामे चालू आहेत.

महाराष्ट्रात अवर्षण हे काही कधी केव्हा तरी उद्‌भवणारे, अरिष्ट आता राहिलेले नाही. ती आता वारंवार उद्‌भवणारी संकट परंपरा झाली आहे. तेव्हा याला थोडा तरी आवर घालण्यासाठी ऊस बागायतदारांच्या प्रबल गटाकडून होणाऱ्या पाण्याचा दुरुपयोग नुसता थोपवून भागणार नाही तर लहान लहान पाटबंधारे प्रकल्प आणि योग्य प्रकारे पाण्याची बचत करणाऱ्या विविध स्थानिक योजना फार मोठ्या प्रमाणावर सुरू करून पार पाडण्याची आवश्यकता आहे. ही सर्व कामे रोजगार हमी योजनेखाली करता येण्याजोगी आहेत. तथापि, इरिगेशनवर रोजगार हमी योजनेखाली होणारा खर्च दरवर्षी कमी कमी होत आहे. १९८२-८३ मध्ये हा खर्च ४०.७ टक्के होता तो १९९०-९१ मध्ये १४.७ टक्के झाला आहे.

सर्वांना आकर्षित करणाऱ्या भव्य दिव्य नावाने सुरू झालेली रोजगार हमी योजना शहरी कामगार, नोकरवर्ग आणि व्यावसायिकांकडून जबरदस्त कर वसूल करत आहे. आणि ग्रामीण गरिबांना सहाय्य करण्याची केवळ चेष्टा करत आहे. व्यवसाय कर देणाऱ्यांची यात जशी फसवणूक होत आहे. तशीच अवर्षणग्रस्त शेतकऱ्यांचीही मोठी फसवणूक केली जात आहे. नुसता कायदा केल्याने ग्रामीण गरिबांच्या बेरोजगारीची समस्या सुटली असल्याचा दावा करणे हाही फसवणुकीचाच एक भाग आहे. राज्य शासनाकडून होत असलेल्या या घोर फसवणुकीचा कामगार संघटनांनी आणि ग्रामीण गरिबांच्या संघटनांनी वेळीच विरोध केला पाहिजे.

(मणीबेन कारा इन्स्टिट्यूटनी केलेल्या अभ्यासाचा स्वैर अनुवाद)

अनुवादक : **रा. वि. भुस्कुटे**

## परिशिष्ट ३

### नागरी श्रमिकेतर कर्मचाऱ्यांकरिता ग्राहक किंमतीचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष १९८४-८५=१००)

| वर्ष/महिना<br>१ | मुंबई<br>२ | औरंगाबाद<br>३ | नागपूर<br>४ | पुणे<br>५ | सोलापूर<br>६ | अखिल भारत<br>७ |
|---|---|---|---|---|---|---|
| १९८९-९० | १३९ | १४७ | १४४ | १४४ | १४१ | १४५ |
| १९९०-९१ | १५४ | १६५ | १६२ | १६२ | १५७ | १६१ |
| १९९१-९२ | १८० | १९१ | १८२ | १८२ | १८४ | १८३ |
| १९९२-९३ | २०४ | २०९ | १९८ | २०१ | २०४ | २०२ |
| १९९३-९४ * | २१७ | २१९ | २०७ | २१० | २११ | २१३ |
| डिसेंबर १९९२ | २०८ | २११ | २०० | २०४ | २०५ | २०५ |
| जानेवारी १९९३ | २०८ | २१३ | २०० | २०३ | २०५ | २०५ |
| फेब्रुवारी १९९३ | २०९ | २१० | २०१ | २०४ | २०४ | २०५ |
| मार्च १९९३ | २१० | २०९ | २०० | २०४ | २०३ | २०५ |
| एप्रिल १९९३ | २१२ | २०९ | २०० | २०४ | २०३ | २०६ |
| मे १९९३ | २१३ | २११ | २०२ | २०३ | २०५ | २०७ |
| जून १९९३ | २१६ | २१२ | २०४ | २०७ | २०७ | २१० |
| जुलै १९९३ | २१६ | २१९ | २०५ | २०९ | २१० | २१३ |
| ऑगस्ट १९९३ | २१७ | २२२ | २१० | २११ | २१२ | २१५ |
| सप्टेंबर १९९३ | २१७ | २२४ | २१० | २१४ | २१५ | २१७ |
| ऑक्टोबर १९९३ | २२० | २२५ | २१२ | २१५ | २१६ | २१८ |
| नोव्हेंबर १९९३ | २२३ | २२७ | २१३ | २१७ | २१८ | २२० |
| डिसेंबर १९९३ | - | - | - | - | - | |

*८ महिन्याची सरासरी

आधार - केंद्रीय सांख्यिकी संघटना, नवी दिल्ली.

महाराष्ट्र व अखिल भारतातील शेतमजुरांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष : शेतकी वर्ष १९६०-६१=१००)

| वर्ष/महिना | महाराष्ट्र | | अखिल भारत | |
|---|---|---|---|---|
| | अन्न गट | सर्वसाधारण निर्देशांक | अन्न गट | सर्वसाधारण निर्देशांक |
| भार | ७६-०७ | १००-०० | ७८-१२ | १००-०० |
| १९६१-६२ | ९७ | ९८ | - | - |
| १९६६-६७ | १९० | १७३ | १९८ | १८१ |
| १९७१-७२ | २२३ | २०४ | २११ | १९६ |
| १९७६-७७ | ३३८ | ३०९ | ३१३ | २९३ |
| १९८१-८२ | ५१५ | ४६२ | ४८८ | ४४४ |
| १९८६-८७ | ६२२ | ५७१ | ६१८ | ५७२ |
| १९८९-९० | ८२५ | ७५१ | ८१० | ७४६ |
| १९९०-९१ | ८२९ | ७६४ | ८६८ | ८०३ |
| १९९१-९२ | ११०७ | ९९१ | १०४८ | ९५८ |
| १९९२-९३ | १२९८ | ११५२ | ११८० | १०७६ |
| १९९३-९४ * | ११०३ | १०१५ | ११९२ | १०९५ |
| डिसेंबर १९९२ | १२३६ | ११०६ | ११६५ | १०६७ |
| जानेवारी १९९३ | १२२५ | ११०१ | ११६२ | १०६६ |
| फेब्रुवारी १९९३ | ११५८ | १०५१ | ११४९ | १०५८ |
| मार्च १९९३ | १११२ | १०१७ | ११४२ | १०५३ |
| एप्रिल १९९३ | १०७७ | ९९० | ११२५ | १०३९ |
| मे १९९३ | १०७० | ९८६ | ११२३ | १०३८ |
| जून १९९३ | १०८३ | १००० | ११४५ | १०५७ |
| जुलै १९९३ | १०७७ | ९९६ | ११५७ | १०६८ |
| ऑगस्ट १९९३ | ११०९ | १०२१ | ११८३ | १०८८ |
| सप्टेंबर १९९३ | ११०० | १०१४ | १२१४ | १११३ |
| ऑक्टोंबर १९९३ | ११०३ | १०१७ | १२४० | ११३४ |
| नोव्हेंबर १९९३ | ११३५ | १०४१ | १२६७ | ११५६ |
| डिसेंबर १९९३ | ११७३ | १०७१ | १२७८ | ११६६ |

आधार - लेबर ब्यूरो, सिमला, भारत सरकार

* ९ महिन्यांची सरासरी

## परिशिष्ट ४

### अखिल भारतीय घाऊक किंमतीचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष : १९८१-८२=१००)

| वर्ष | मूलभूत वस्तू | इंधन, शक्ती, दिवाबत्ती व वंगण | उत्पादित पक्का माल | सर्व वस्तू |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| भार | (३२.२९५) | (१०.६६३) | (५७.०४२) | (१००.०००) |
| १९८२-८३ | १०६.७ | १०६.५ | १०३.५ | १०४.९ |
| १९८३-८४ | ११८.२ | ११२.५ | १०९.८ | ११२.८ |
| १९८४-८५ | १२५.५ | ११७.३ | ११७.५ | १२०.१ |
| १९८५-८६ | १२५.७ | १२९.८ | १२४.५ | १२५.४ |
| १९८६-८७ | १३७.१ | १३८.६ | १२९.२ | १३२.७ |
| १९८७-८८ | १५२.६ | १४३.३ | १३८.५ | १४३.६ |
| १९८८-८९ | १६०.१ | १५१.२ | १५१.५ | १५४.३ |
| १९८९-९० | १६३.६ | १५६.६ | १६८.६ | १६५.७ |
| १९९०-९१ | १८४.९ | १७५.८ | १८२.८ | १८२.७ |
| १९९१-९२ | २१८.३ | १९९.० | २०३.४ | २०७.८ |
| १९९२-९३ | २३४.६ | २२७.१ | २२५.६ | २२८.७ |
| १९९३-९४* | २४९.५ | २५९.१ | २४१.१ | २४५.७ |

अस्थायी *१० महिन्यांची सरासरी

आधार - आर्थिक सल्लागार, उद्योग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.

### औद्योगिक कामगारांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमतींचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष : १९८२=१००)

| वर्ष/महिना | अन्न | पान-सुपारी मादक पदार्थ व तंबाखू | इंधन व दिवाबत्ती | घरभाडे | कापड, बिछाना व पादत्राणे | संकीर्ण | सर्वसाधारण निर्देशांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १९९०-९१ | १९९ | २४३ | १८६ | १८५ | १५४ | १८७ | १९३ |
| १९९१-९२ | २३० | २८० | २०४ | १९८ | १६९ | २१० | २१९ |
| १९९२-९३ | २५४ | ३१५ | २२० | २१२ | १८५ | २३२ | २४० |
| १९९३-९४* | २६९ | ३३७ | २३२ | २२२ | २०० | २४८ | २५६ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| डिसेंबर १९९२ | २५६ | ३२० | २२२ | २१२ | १८७ | २३६ | १४३ |
| जानेवारी १९९३ | २५२ | ३२३ | २२४ | २१९ | १८६ | २३८ | २४१ |
| फेब्रुवारी १९९३ | २५२ | ३२६ | २२६ | २१९ | १८७ | २४० | २४२ |
| मार्च १९९३ | २५३ | ३२७ | २२७ | २१९ | १८८ | २४१ | २४३ |
| एप्रिल १९९३ | २५३ | ३३१ | २२८ | २१९ | १९६ | २४४ | २४५ |
| मे १९९३ | २५५ | ३३३ | २२९ | २१९ | १९७ | २४४ | २४६ |
| जून १९९३ | २६२ | ३३४ | २३० | २१९ | १९८ | २४५ | २५० |
| जुलै १९९३ | २६६ | ३३७ | २३१ | २२४ | २०० | २४७ | २५३ |
| ऑगस्ट १९९३ | २७० | ३३८ | २३२ | २२४ | २०१ | २४८ | २५६ |
| सप्टेंबर १९९३ | २७५ | ३३९ | २३३ | २२४ | २०२ | २४९ | २५९ |
| ऑक्टोबर १९९३ | २७९ | ३४० | २३४ | २२४ | २०२ | २५० | २६२ |
| नोव्हेंबर १९९३ | २८४ | ३४१ | २३५ | २२४ | २०३ | २५१ | २६५ |
| डिसेंबर १९९३ | २८१ | ३४४ | २३६ | २२४ | २०२ | २५५ | २६४ |

*९ महिन्यांची सरासरी

आधार - लेबर ब्यूरो,सिमला, भारत सरकार

## परिशिष्ट ५

शेतीमालाच्या निर्धारित किंमती (प्रत्येक क्विंटलला रुपयांत)

| पिक | ८९-९० | ९०-९१ | ९१-९२ | ९२-९३ | ९३-९४ | ९४-९५ | ९५-९६ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| भात भरड | १८५ | २०५ | २३० | २७० | ३१० | ३४० | ३६० |
| भात उत्तम | १९५ | २०५ | २४० | २८० | ३३० | ३६० | ३७५ |
| ज्वारी बाजरी | १६५ | १८० | २०५ | २४० | २६० | २८० | ३०० |
| डाळ, तूर, मुग | ४२५ | ४८० | ५०५ | ६४० | ७०० | ७६० | ८०० |
| भूईमुग शेंग | ५०० | - | ६४५ | ७९० | ८०० | ८६० | ९०० |
| सोयाबीन पिवळे | ३७० | ४०० | ४४५ | ५२५ | ५८० | ६५० | ६८० |
| सूर्यफुल | ५३० | ६०० | ६७० | ८०० | ८५० | ९०० | ९५० |
| कापूस | ५७० | ६२० | ६९५ | ८०० | ९०० | १००० | ११५० |
| कापूस उत्तम | ६९० | ७५० | ८४० | ९५० | १०५० | १२०० | १३५० |
| ऊस | २० | २३ | २६ | ३१ | ३४-५० | ३९-१० | ४२-५० |
| उतारा ८.५% | | | | | | | |

## परिशिष्ट ६

### आयोगाने शिफारस केलेल्या व शासनाने निश्चित केलेल्या किमान आधारभूत किंमती

(रुपये प्रत्येक क्विंटलला)

| पिकाचा प्रकार | बाजार वर्ष १९९१-९२ सीएसीपीने शिफारस केलेप्रमाणे | १९९१-९२ सीएसीपी कडून सुधारीत केलेल्या | १९९२-९३ शासनाने निश्चित केलेल्या | १९९२-९३ सीएसीपीने शिफारस केलेप्रमाणे | १९९२-९३ शासनाने निश्चित केलेल्या | १९९३-९४ सीएसीपीने शिफारस केलेप्रमाणे | १९९३-९४ सीएसीपी कडून सुधारीत केलेल्या | १९९३-९४ शासनाने निश्चित केलेल्या | १९९४-९५ सीएसीपीने शिफारस केलेप्रमाणे | १९९४-९५ शासनाने निश्चित केलेल्या | १९९५-९६ सीएसीपीने शिफारस केलेप्रमाणे | १९९५-९६ शासनाने निश्चित केलेल्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| भात (सामान्य) | २२० | २३५ | २३० | २६० | २७० | ३१० | --- | ३१० | ३४० | ३४० | ३५५ | ३६० |
| भात (चांगल्या प्रतीचे) | २३० | २४५ | २४० | २७० | २८० | ३२० | --- | ३३० | ३६० | ३६० | ३७५ | ३७५ |
| भात (उत्तम प्रतीचे) | २४० | २५५ | २५० | २८० | २९० | ३३० | --- | ३५० | ३८० | ३८० | ३९५ | ३९५ |
| भरड धान्य | १९५ | २०५ | २०५ | २२५ | २४० | २६० | --- | २६० | २७५ | २८० | २९५ | ३०० |
| मका | १९५ | २०५ | २१० | २२५ | २४५ | २६५ | --- | २६५ | २८५ | २९० | ३०५ | ३१० |
| अऱ्हार | ५३० | ५५० | ५४५ | ६०० | ६४० | ७०० | --- | ७०० | ७६० | ७६० | ८०० | ८०० |
| मूग | ५३० | ५५० | ५४५ | ६०० | ६४० | ७०० | --- | ७०० | ७६० | ७६० | ८०० | ८०० |
| उडीद | ५३० | ५५० | ५४५ | ६०० | ६४० | ७०० | --- | ७०० | ७६० | ७६० | ८०० | ८०० |
| शेंगदाणा | ६२५ | ६५० | ६४५ | ७०० | ७५० | ७९० | --- | ८०० | ८६० | ८६० | ९०० | ९०० |
| सूर्यफुल बी | ६५० | ६७५ | ६७० | ७५० | ८०० | ८३० | --- | ८५० | ९०० | ९०० | ९५० | ९५० |
| सोयाबीन | | | | | | | | | | | | |
| काळे | ३८० | ४०० | ३९५ | ४५० | ४७५ | ५२५ | --- | ५२५ | ५५० | ५७० | ६०० | ६०० |
| पिवळे | ४३० | ४५० | ४४५ | ५०० | ५२५ | ५८० | --- | ५८० | ६३० | ६५० | ६८० | ६८० |
| तीळ | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | ८५० | ८५० |
| बिगर बियाणे कापूस | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | ७०० | ७०० |
| एफ् ४१४ (एच ७७७) | ६५० | ६७० | ६९५ | ७५० | ८०० | ८५० | --- | ९०० | १००० | १००० | ११५० | ११५० |
| एच -४ | ७८० | ८०० | ८४० | ९०० | ९५० | १००० | --- | १०५० | १२०० | १२०० | १३५० | १३५० |
| ज्यूट टीडी-५ | ३५० | --- | ३७५ | ३९० | ४०० | ४३० | ४५० | ४७० | ४७० | ४७० | ४९० | ४९० |

(पुढील मजकूर पान नं. २८ वर)

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ऊस * | २६ | --- | २६ | २९ | ३१ | ३४.५० | --- | ३४.५० | ३९.१०$ | ३९.१०$ | ४२.५०$$ | ४२.५० |
| खोबरे ** | | | | | | | | | | | | |
| वाटी | १७०० | --- | १७०० | --- | --- | २००० | --- | २१५० | २२२५ | २३५० | २३५० | २५०० |
| गोटा | १८५० | --- | १८५० | --- | --- | २२०० | --- | २३५० | २४५० | २५७५ | २५७५ | २७२५ |
| व्हीएफ्सी तंबाखू | | | | | | | | | | | | |
| एफ-२ | १४.२५ | १४.७५ | १४.७५ | १६ | १६ | १८ | --- | १८ | १८.५० | १८.५० | --- | --- |
| एल्-२ | १५.५० | १६.०० | १६.०० | १७.५ | १७.५ | २० | --- | २० | २१.०० | २१.०० | --- | --- |
| गहू | २२५ | --- | २२५ | २४५ | २७५ | २८५ | ३०५ | ३३० | ३५० | ३५० | ३६० | ३६० |
| बार्ली | १९० | --- | २०० | २०५ | २१० | २३० | २४५ | २६० | २७५ | २७५ | २८५ | २८५ |
| हरभरा | ४५० | --- | ४५० | ५०० | ५०० | ५५० | ५८० | ६०० | ६४० | ६४० | ६७० | ६७० |
| सरसी बियाणे | | | | | | | | | | | | |
| मोहरी | ६०० | --- | ६०० | ६७० | ६७० | ७१० | ७४० | ७६० | ८१० | ८१० | ८३० | ८३० |
| सॅफ फ्लॉवर | ५७५ | --- | ५७५ | ६४० | ६४० | ६७५ | ७०० | ७२० | ७६० | ७६० | ७८० | ७८० |

* : रुपये २५ बोनससह  ** : खोबऱ्याचे बाबतीत वर्ष १९९१-९२ हे सन १९९१शी संबंधित समजावे

\+ : उसासाठी किमान वैधानिक किंमती होत्या. या किंमती ८.५ टटक्के उताऱ्याशी निगडीत आहेत. त्यानंतर ८.५ टक्क्यापेक्षा प्रत्येक ०.१ पेक्षा जादा टक्केवारीस त्या प्रमाणात वाढ दिली जाईल.

$ : १० टक्क्यांहून जास्त येणाऱ्या टक्क्याच्या सापेक्ष ०.१ वाढीस क्विंटलला ०.६० रु. वाढ दिली जाईल.

$$ : १० टक्क्यांहून जास्त येणाऱ्या टक्क्याच्या सापेक्ष ०.१ वाढीस क्विंटलला ०.६५ रु. वाढ दिली जाईल.


● प्रकाशक : कॉ. संतराम पाटील

१२८९ 'सी' श्रमिक, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर - ४१६ ००२. फोन : २९५२९

● मुद्रक : भारती मुद्रणालय, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर.